म्हाडा
MHADA

**कार्यकारी अभियंता / ग-उत्तर विभाग यांचे कार्यालय,**
**मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,**
**दुसरा मजला, सनशाईन प्लाझा, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय**
**मार्ग, दादर (पुर्व), मुंबई- ४०००१४**

जा.क्र. काअ/ग-उत्तर/उवि- १/E-    /DIS-    /२०२६    दिनांक :- १२.०६.२०२६

**म्हाड अधिनियम १९७६ मधील कलम ७७(ब) अंतर्गत धोक्याचे सूचनापत्र**

प्रति,

| | |
|---|---|
| सर्व भाडेकरु/ रहिवाशी व<br>इमारत क्र. ४३-४५, गारेगांवकर वाडी, एस.के.बोले रोड, अपोझीट ॲनथोनी डीसील्वा स्कुल, दादर (प), मुंबई-२८.<br>हाथीबाग मार्ग, माझगाव,<br>मुंबई - ४०० ०१०.<br>DIS- | श्री. अनिल रामराव नाईक,<br>शॉप नं. ३१ गोरेगावकर प्रीमीसेस, एस.के.बोले रोड, अपोझीट अँथोनी डिसील्वा स्कुल, दादर, मुंबई-२८.<br>**(As per PR Card )**<br>DIS- |
| मेसर्स विन विन असोसिएट्स (पीनाक भारत अँड कंपनी अँड बीना व्ही अडवाणी)<br>३३२ अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रियल इस्टेट (ए-१), सीताराम जाधव मार्ग,<br>लोअर परळ (प), मुंबई-१३.<br>**(As per Commercial Execution Application No.22 of 2016)** | |

**विषय :-** **उपकर** इमारत अंतिम भुखंड क्र. ३०९, टिपीएस- IV, माहिम उपविभाग, गारेगांवकर वाडी, एस.के.बोले रस्ता, (इमारत A-front उपकर क्र. ग-उ- ३२३८(१), इमारत A-Rear उपकर क्र. ग-उ- ३२३८(२), इमारत क्र. B उपकर क्र.ग-उ- ३२३६(३) , इमारत क्र. C उपकर क्र. ग-उ ३२३६(४) दादर (प), मुंबई- ४०००२८ या **इमारतीच्या धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा सूचना**

**संदर्भ :-** १) मे.साई सागर आर्च यांनी इमारतीचा संरचनात्मक अहवाल या कार्यालयास दि. १८.१२.२०२४ रोजी प्राप्त.
२) या कार्यालयाचे धोक्याचे सुचना पत्र क्र. I-११२६२८४ दि. ०९.०४.२०२५
३) या कार्यालयाचे सर्वसाधारण निष्कासन सुचना पत्र क्र. DIS-१२७२६३५ दि. २६.०५.२०२५

महोदय / महोदया,

या कार्यालयातर्फे मे.साई सागर आर्च यांनी यांनी विषयांकित इमारतीचा संरचनात्मक परिक्षण अहवाल केला असून इमारतीची वर्गवारी **C-१** म्हणजेच To be Demolished आहे. सदर अहवालाच्या आधारे, इमारत धोकादायक असल्याची या कार्यालयामार्फत निश्चिती करण्यात आली. या कार्यालयामार्फत संदर्भिय पत्र क्र. २,३, नुसार आपणांस निष्कासन बाबत कळविलेले आहे. अद्याप आपणांमार्फत कोणतेही कागदपत्र मंडळास सादर झालेले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणी आपणास पुन:श्च सूचित करण्यात येते कि, विषयांकित इमारतीत वास्तव्य करणे धोकादायक असून आपण आपली सदनिका तातडीने रिक्त करुन इमारत निष्कासित करावी. आपणास पर्यायी निवासस्थानासाठी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळ्याची आवश्यकता असल्यास संदर्भ क्र. २ व ३ नुसार आपली कागदपत्रे या कार्यालयास तात्काळ सादर करावीत, जेणेकरुन आपणास संक्रमण शिबीरातील गाळा उपलब्ध करुन देणे या कार्यालयास शक्य होईल. विषयांकित इमारतीचा विद्युत सेवा व पाणीपुरवठा खंडीत करणेबाबत या कार्यालयाकडून दि. १९.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मुंबई महानगरपालिकेस कळविलेले आहे.

उपरोल्लेखित बाबींची पूर्तता करुन आपण आपला गाळा निष्कासित करुन इतरत्र स्थलांतरीत झाला नाहीत व इमारतीत आपले वास्तव्य सुरु ठेवलेत आणि त्या कालावधीत इमारतीत पडझडीने अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास, त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची आपण गांभिर्याने नोंद घ्यावी.

आपला विश्वासू ,

**कार्यकारी अभियंता ग-उत्तर विभाग**
**मुं.इ.दु व पु.मंडळ, मुंबई**

प्रत,

- मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव सविनय सादर.**DIS-**
- उपमुख्य अभियंता (परिमंडळ-४) / मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहितीस्तव सादर.**DIS-**
- उपमुख्य अधिकारी (सं.गा.) / मुं.इ.दु व पु.मंडळ, गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रा, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित. **DIS-**
- सहाय्यक आयुक्त, ग-उत्तर विभाग, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित.-- विषयांकित इमारतीचा विद्युत सेवा व पाणीपुरवठा खंडीत करणेबाबत या कार्यालयाच्या दि. २०.०६.२०२५ रोजीच्या पत्रानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. **DIS-**
- मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक, दादर २१ पोलिस स्टेशन, दादर, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव रवाना. **DIS-**
- कार्यकारी अभियंता (इ व का), ग- उत्तर, मुंबई महानगरपालिका, खोली क्र. ३९, पहिला मजला, हरिशचंद्र येवले रस्ता, दादर (प), मुंबई - ४०००२८ यांस माहिती व कार्यवाहीस्तव रवाना. **DIS-**
- वरिष्ठ अग्निशमन अधिकारी, ग-उत्तर अग्निशमन केंद्र, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांस माहिती व कार्यवाहीस्तव रवाना. **DIS-**
- इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविणेसाठी **DIS-**
  - इमारतीच्या घरमालकाची नोंद या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या अनुषंगाने नमूद करण्यात आलेली आहे. तथापि सदर नोंदीव्यतिरिक्त इमारतीच्या मालकीचे अन्य दावेदार असल्यास त्यांनी व इमारतीच्या सर्व भाडेकरु/ रहिवाशी यांनी सदर धोक्याच्या सूचनेची दखल घेणेकामी या नोटीशीची प्रत इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविण्यात येत आहेत.